महावितरण

क्र.साप्रवि/मभाक/न.क्र.७७/
**महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनी मर्यादित**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
*मुंबई - ४०० ०१९.*

## प्रशासकीय परिपत्रक क्र. १०० दिनांक २१ / ०३ / २००७

विषय : दैनंदिन प्रशासकीय कामकाज मराठी भाषेतून करण्याबाबत.

संदर्भ : प्रशासकीय परिपत्रक क्र. ७४ (म.भा.क.), दिनांक १८/०९/२००६

---

दैनंदिन प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा १०० टक्के वापर करण्याचे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे. निमशासकीय संस्थांनाही ते धोरण लागू असल्याने तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळाने ते धोरण अंगीकारले व राबवले होते.

२. दिनांक ४ जून २००६ रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळाच्या पुर्नरचनेनुसार महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनी संस्थापित झाली असून सदर कंपनीनेही दैनंदिन प्रशासकीय कामकाज १०० टक्के मराठी भाषेतून करण्याचे महाराष्ट्र शासनाचे उपरोक्त धोरणच अंगीकारले आहे.

३. महाराष्ट्र शासन सदर संदर्भात वेळोवेळी परिपत्रके जारी करून दैनंदिन प्रशासकीय कामकाज मराठी भाषेतूनच करण्याबाबत सर्व संबंधितांना स्मरण देत असते. त्याअनुसार महाराष्ट्र शासनाने जारी केलेले दि. १९ जुलै २००६ चे पत्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या अवर सचिवांनी दि. १९ ऑगस्ट २००६ च्या पत्रासोबत माहिती व योग्य त्या उचित कार्यवाहीसाठी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनी यास पाठविले होते.

४. त्या पत्रातील आदेशांचा पाठपुरावा करून मुख्य महाव्यवस्थापक (क) यांनी, प्रशासकीय परिपत्रक ७४ (म.भा.क.), दिनांक १८/०९/२००६ अन्वये सर्व संबंधितांना दैनंदिन प्रशासकीय कामकाज मराठी भाषेतूनच करण्याविषयी व अधिका-यांचे नामफलक मराठीतून लिहिण्याबाबत आदेश जारी केले होते.

५. परंतु कंपनीच्या स्थापनेपासून म्हणजे दिनांक ४ जून २००५ पासून आजतागायत निगम कार्यालयातून जारी करण्यात आलेली सुधारपत्रे, परिपत्रके, बढती/बदलीचे प्रशासकीय आदेश यांचे अवलोकन केले असता प्रामुख्याने (आणि अनावश्यकपणे) ते इंग्रजी भाषेतूनच जारी केलेले आढळतात.

६. महाराष्ट्र राजभाषा (वर्जित प्रयोजने) नियम १९६६ अनुसार वर्जित प्रयोजनाखाली (EXCEPTION) येणा-या बाबी खालीलप्रमाणे आहेत.

(१) भारतीय राजदूतावास, वाणिज्यिक कार्यालये व व्यापारविषयक आयोग यांसह भारत सरकार व त्याच्या अधीन असलेली कार्यालये यांच्याशी पत्रव्यवहार;

(२) भरताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४६ च्या परंतुकात उल्लेखिल्याप्रमाणे तसा करारनामा नसलेल्या कोणत्याही राज्य सरकारशी पत्रव्यवहार;

(३) परराष्ट्रीय राजदूतावास किंवा वाणिज्यदूतावास यांच्याशी पत्रव्यवहार;

(४) त्या काळापुरत्या अंमलात असलेल्या कोणत्याही विधीद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित व अशा विधीअन्वये न्यायिक किंवा न्यायिकवत शक्तींचा वापर करणा-या कोणत्याही न्यायाधिकरणाने, मंडळाने किंवा प्राधिकरणाने (मग त्यास कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो) दिलेले निर्णय किंवा आदेश;

(५) महालेखापालाकडे द्यावयाचे लेखे;

(६) महालेखापालाशी पत्रव्यवहार;

(७) वैध अभिप्रायांबाबतची सर्व विवरणपत्रके आणि सर्व वैध अभिप्राय, वैध टाचणे, विधिविधान किंवा हस्तांतरलेखन याबाबतचे सर्व ठराव आणि विधिविधानाची व हस्तांतरलेखनाची प्रारूपे, उच्च न्यायालयातील व सर्वोच्च न्यायालयातील अभियोगासंबंधींच्या बाबी, वैध, संकलने आणि विधिपरीक्षा;

(८) नोटरीबाबत अधिनियम, १९५२ याची अंमलबजावणी;

(९) भारतीय विधि प्रतिवृत्ते (Indian Law Reports);

(१०) वैद्यकीय औषधी योजना, शवपरीक्षा अहवाल व न्याय वैद्यकीय प्रकरणातील अहवाल आणि राज्य सरकारच्या वैद्यकीय विभागातील तत्सम तांत्रिक बाबी.

७. या बाबी विचारात घेता वर परिच्छेद ५ मध्ये नमूद केलेले कार्यालयीन आदेश, सुधारपत्रे, परिपत्रके इत्यादीपैकी बहुसंख्य आदेश इत्यादी मराठी भाषेतून जारी करता येऊ शकले असते असे आढळते. बदली/बढतीचे आदेश, कार्यभार सोपविणे, स्वीकारणे विषयक आदेश हे तर संस्थेच्या अंतर्गत व्यवहारापुरतेच मर्यादित असल्याने ते इग्रजीतून जारी करणे हे निश्चितपणे चुकीचे आहे.

८. यास्तव दैनंदिन प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर आवर्जून करण्याबाबत गांभीर्याने व प्रामाणिकपणे पाऊले उचलणे आवश्यक आहे, याची नोंद निगम कार्यालयातील शाखा/विभाग प्रमुख, तसेच क्षेत्रीय कार्यालयांतील संबंधितांनी घ्यावी, आणि आपापल्या कार्यालयातून मराठीतून/इंग्रजीतून प्रसृत होणा-या आदेशांच्या, परिपत्रके इत्यादींच्या प्रती माहितीसाठी आस्थापना अधिकारी (र. व का.), महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनी मर्यादित, एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत, धारावी, मुंबई-४०० ०१९ यांजकडे पाठवाव्यात.

९. वरील परिच्छेद ६ मध्ये नमूद केलेल्या वर्जित प्रयोजनाच्या (EXCEPTION) बाबींचे काळजीपूर्वक अनुसरण करावे व दैनंदिन प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा १०० टक्के वापर करण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या धोरणाशी विसंगत अशी कार्यवाही आपल्या कार्यालयाकडून होऊ नये याची दक्षता कंपनीतील सर्व संबंधितांनी घ्यावी.

मुख्य महाव्यवस्थापक (क)

प्रति,
महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना

File-77